**महाराष्ट्र शासन**

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र राज्य
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ

**कार्यालय भाडेतत्वावर घेण्याबाबत**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसाहयाने पं. दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना ( राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष दिग्रस व मारेगाव यांच्या करिता कार्यालय एका वर्षाकरिता भाडेतत्वावर घेणे आहे. त्याकरिता पुरवठादार / एजन्शी यांच्याकडून निविदा प्रणालीद्वारे निविदा दि. 04 / 07 /२०१९ ते 10 /07/२०१९ या कालावधीत मागविण्यात येत आहे.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी वाहन पुरवठादार / संस्था यांच्याकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१) किमान १००० ते १२०० चौ.फुट
२) किमान २ स्वच्छतागृह असावे.
३) मुबलक पाणी पुरवठा असावा.
४) विद्युत पुरवठा अद्यावत असावा.
५) पार्किंग ची सोय असावी.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक कार्यालय पुरवठादार यांनी सबंधित तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथून वा जिल्हा परिषद ची वेब साईट zpyavatmal@gmail.com या वरून डाऊन लोड करता येईल. वर नमूद केलेल्या कागदपत्रासह जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष येथे दि.10 / 07 /२०१९ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग करून घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

for

जिल्हा अभियान व्यवस्थापक
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यवतमाळ.